महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड, ४ था मजला, प्लॉट जी-९, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१.
Email : ciro@mahadiscom.in website : www.mahadiscom.in दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
सी. आय. एन. नं. U४०१०९MH२००५SGC१५३६४५

जा. क्र. औसंवि/ब/ 28199 दिनांक : 9 JUL 2015

# परिपत्रक

**विषय :** मेडीक्लेम योजना कार्यान्वित नसताना कर्मचाऱ्यांच्या वैद्यकीय प्रतिपूर्ती संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.
**संदर्भ :** सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र. ७३१, दि. ०८.०१.२०१५

*********

दि. ०१.०१.२०१५ ते दि. ३१.१२.२०१५ या कालावधीकरिता महावितरणमधील सर्व कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्यावर अवलंबित असणाऱ्या कुटुंबातील ०५ सदस्यांकरिता मेडीक्लेम योजना (MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy) दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे यांच्यामार्फत सुरु करण्यात आलेली आहे. विमा कंपनीकडून सदर योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांना वैद्यकीय सुविधाचा लाभ देणे ही बाब तुर्त स्थगित आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाकडून कर्मचाऱ्यांना सदर योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत व कंपनीच्या नियमित वैद्यकीय प्रतिपूर्ती संदर्भातील सामान्य आदेश क्र. २० (क) अंतर्गत काय कार्यवाही करावी याबाबत विचारणा होत आहे.

याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, उपरोक्त संदर्भीय परिपत्रकातील मुद्दा क्र. ११ नुसार कर्मचाऱ्यांकरिता सामान्य आदेश क्र. २० (क) चा लाभ पूर्ववत कायम आहे. उपरोक्त पॉलिसी कालावधीत दि ओरिएंटल इन्शूरन्स कंपनी, पुणे व MD India यांच्यामार्फत मेडीक्लेम योजना काही कारणाकरिता कार्यान्वित नसल्यास अशा प्रसंगी महावितरणच्या प्रचलित धोरणाप्रमाणे फक्त कर्मचाऱ्यांसंदर्भात (कुटुंबीय वगळता) सा. आ. क्र. २० (क) प्रमाणे वैद्यकीय प्रतिपूर्तीचा लाभ उर्वरीत सर्व नियम / विनियम यांचे अधीन राहून देण्यात यावा.

सदर परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावरील "MSEBHCL Mediclaim" या शिर्षकाखाली उपलब्ध असून कर्मचाऱ्यांच्या सोयीकरिता सदर परिपत्रक महावितरणच्या Intranet – RAPDRP या संकेत स्थळावरील Industrial Relations Department यावर देखील उपलब्ध आहे.

(नीलेश र. गटणे)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रति**
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी महावितरण कंपनी मर्यादित.

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :**
१) व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.
२) संचालक (वित्त) / (संचलन) / (प्रकल्प) म.रा.वि.वितरण कंपनी मर्या., मुंबई.

**प्रत सस्नेह रवाना :**
कार्यकारी संचालक (मासं), महापारेषण / महानिर्मिती